**जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय**

क्र.कार्या-5/मगांराग्रारोहयो/सलेअ/221 /20

दिनांक :- 09 मे, 2020 जुन.

विषय :- **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- 2005**

मगांराग्रारोहयो अंतर्गत नियोजन पुस्तीका छपाई करून पुरविण्याकरिता दरपत्रक मागविण्यासाठी सुचना.

संदर्भ :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गडचिरोली यांचे कार्यालयीन पत्र क्र./जिपग/मगांराग्रारोहयो कक्ष/ 156/20 दिनांक 21 मे, 2020

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वित्तीय वर्ष 2020-21 च्या तहसिल व पंचायत समितीस्तरावर पुरवठा करावयाचा असल्यामुळे सदर नियोजन पुस्तिका 168 प्रती छपाई करून पुरविण्याकरिता अधिकृत मुद्रणालय धारकाकडुन मोहोरबंद दरपत्रक मागविण्यात येत आहे. दरपत्रक सादर करण्याचा कालावधी दिनांक -09 जु. 2020 ते --09 जुन, 2020 ला दुपारी 02.00 वाजता पर्यंत राहिल. प्राप्त दरपत्रके दिनांक 10- जुन, 2019 ला सकाळी 12.00 वाजता उघडण्यात येईल या कार्यालयास सादर करावयाच्या दरपत्रकावाबत विहीत अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.

**अटी व शर्ती**

1. मुद्रणालयधारक अधिकृत परवानाधारक असावा.प्रत्येक मुद्रणालयधारकास फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी असेल.
2. दरपत्रक हे नमुद केलेल्या एकुण साहित्याची पुर्तता करणारे सर्वात कमी किमतीचे दरपत्रक असेल.
3. मुद्रणालय धारकाने दरपत्रक सादर करतांना त्यांचा CGST/SGST क्रमांक दरपत्रकावर ठळक पणे नोंदवावा. तथापी ज्या मुद्रणालय धारकास CGST/SGST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या लेटर हेडवर दरपत्रक देण्यात यावे. दरपत्रक सर्व करासहीत व वाहतूक खर्चासह सादर करावे. तसेच दरपत्रकासोबत मुद्रणालय धारकाचे पॅन कार्डची सांक्षाकीत प्रत जोडणे आवश्यक राहिल.
4. दरपत्रक सादर करणाऱ्या मुद्रणालयधारकाची मागील तीन आर्थिक वर्षातील उलाढाल रू. 5 लक्ष पेक्षा अधिक असावी.
5. मागील दोन वित्तीय वर्षात मुद्रणालय धारकाने शासकीय कार्यालयास मागणीनुसार पुरवठा केलेला असावा. सदर कार्यालयास यापुर्वी पुरवठा केलेला असल्यास त्याबाबत आवश्यक दस्ताऐवज जोडण्यात यावे.
6. नियोजन पुस्तिकाचे सर्वसमावेशक दर, दरपत्रकामध्ये नमुद करणे आवश्यक राहील. सदर साहित्य छपाईचे आदेश मिळताच सात दिवसाच्या आत कार्यालयास नियोजन पुस्तिकाचा पुरवठा करावा लागेल..
7. सादर केलेली दरपत्रके निर्धारित दिनांकास व वेळेस उघडतांना मुद्रणालय धारक किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणे आवश्यक राहील

**उपजिल्हाधिकारी (रोहयो),**
**गडचिरोली**

Scanned with CamScanner